# आत्मनिर्भर भारत

## भाग दुसरा : गरीब, स्थलांतरीत आणि शेतकरी

14.05.2020

सत्यमेव जयते

Government Of India



# कोविड नंतरच्या परिस्थितीसाठी शेतकरी आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला थेट मदत

- 3 कोटी शेतकऱ्यांनी 4.22 लाख कोटी रुपयांचे कर्ज तीन महिन्यासाठी पुढे ढकलण्याची मुभा योजनेचा घेतला लाभ
- पीक कर्जांवर तात्काळ अनुदान आणि तत्पर परतफेड लाभ, 1 मार्च पासून 31 मे 2020 पर्यंत पुढे ढकलला
- 25,000 रु. कोटी कर्ज मर्यादा असलेले 25 लाख नवीन क्रेडिट कार्ड मंजूर



# कोविड नंतरच्या काळात शेतकरी आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला पतपुरवठा सहाय्य

- १.३.२०२० ते ३०.०४.२०२० दरम्यान कृषीसाठी ८६,६०० कोटी रुपयांची ६३ लाख कर्जे मंजूर

- मार्च २०२० मध्ये नाबार्डकडून सहकारी बँका आणि प्रादेशिक ग्रामीण बँकांना २९५०० कोटी रुपयांचा पुनर्वित्तपुरवठा

- मार्च २०२० मध्ये ग्रामीण पायाभूत विकासासाठी राज्यांना ग्रामीण पायाभूत विकास निधी अंतर्गत ४,२०० कोटी रुपयांचे अर्थसहाय्य

- मार्च २०२० पासून राज्य सरकारी संस्थांना शेतमाल खरेदीसाठी ६७०० कोटी रुपयांची खेळते भांडवल मर्यादा मंजूर



# गेल्या दोन महिन्यात स्थलांतरित आणि शहरी गरिबांना दिलेले पाठबळ

- स्थलांतरितांसाठी निवारा उभारून त्यांच्या अन्न -पाण्याची सोय करण्यासाठी राज्य आपत्ती निवारण निधी वापरण्याची परवानगी भारत सरकारने राज्य सरकारना दिली आहे.
- केंद्र सरकारने सर्व राज्यसरकारांच्या राज्य आपत्ती निवारण निधीत 3 एप्रिल रोजी 11002 कोटी रुपये जमा केले आहेत.
- निवाऱ्यात राहणाऱ्या शहरी निराधार लोकांना टाळेबंदीच्या काळात 28 मार्च 2020 पासून तीन वेळचे आरोग्यदायी सुरक्षित अन्न पुरविले जात आहे.
- 12,000 बचत गटांनी 3 कोटी मास्क आणि 1.20 लाख लिटर सॅनिटायझरची निर्मिती केली आहे. यामुळे शहरी गरिबांना अतिरिक्त रोजगार संधी प्राप्त झाल्या आहेत.
- बचत गटांना पैसा पोर्टलवर खेळते भांडवल पुरविण्याचा प्रायोगिक उपक्रम गुजरातने एप्रिल 2020 मध्ये राबविला आणि आता मे 2020 मध्ये तो सर्व राज्यात राबविला जात आहे.
- 15 मार्च 2020 पासून 7,200 नवीन शहरी गरीब बचत गटांची निर्मिती झाली.





# स्थलांतर करणाऱ्या मजूरांसाठी मनरेगाचा आधार

- 13 मे पर्यंत 14.62 कोटी मनुष्य-दिन काम उपलब्ध करून देण्यात आले
- आत्तापर्यंतचा खर्च जवळपास रुपये 10,000 कोटी
- 1.87 लाख ग्रामपंचायतींमध्ये काल 2.33 कोटी वेतन अवलंबितांना काम दिले गेले
- गत वर्षीच्या मे महिन्याच्या तुलनेत यंदा 40-50% जास्त लोकांनी नोंदणी केली
- गत आर्थिक वर्षाच्या तुलनेत यंदा प्रतिदिन वेतन रुपये 182 वरून रुपये 202 करण्यात आले
- स्थलांतर करणाऱ्या मजूरांची नोंदणी करून घेण्याची मोहीम हाती घेण्यात आली आहे
- राज्य/केेंंद्र शासित प्रदेश यांना कायद्यातील तरतूदीनुसार स्थलांतरित मजूरांना काम देण्याचा सल्ला देण्यात आला आहे
- वृक्षलागवड, फलोत्पादन, गुरांची व्यवस्था यासारख्या गोष्टींसाठी पावसाळ्यातही मनरेगा अंतर्गत कामे सुरू ठेवण्याचे नियोजन सुरू आहे.



# कामगार संहिता- कामगारांना लाभ

- किमान वेतन अधिकाराचे सार्वत्रिकीकरण आणि असंघटीत क्षेत्रातील कामगारांसाठी सर्वांना वेळेत पगार-सध्या किमान वेतन केवळ 30% कामगारांना लागू आहे.
- नॅशनल फ्लोर वेज ची वैधानिक पद्धत लागू केली-यामुळे किमान वेतनातील तफावत दूर होणार
- किमान वेतनाचे सुलभीकरण- ज्यायोगे किमान वेतन दरात सुसूत्रीकरण आणि चांगल्या रितीने पालन होईल
- सर्व कामगारांसाठी नियुक्तीपत्र- यामुळे सुसूत्रीकरण येईल
- कामगारांसाठी वार्षिक आरोग्य तपासणी
- धोकादायक क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांसाठी सुरक्षा आणि आरोग्य संहिता, केवळ 10 कामगार असणाऱ्या कारखान्यांनाही लागू



# कामगार संहिता- कामगारांसाठीचे लाभ

- आंतरराज्यीय स्थलांतरित कामगारांच्या व्याख्येत सुधारणा करण्यात आली असून आता नियोक्त्याने थेट नेमणूक केलेले स्थलांतरित कामगार, कंत्राटदाराने नेमणूक केलेल्या स्थलांतरित कामगारांव्यतिरिक्त स्वतःहून परराज्यात येणारे कामगार यांचा या व्याख्येत समावेश करण्यात आला आहे.
- स्थलांतरित कामगारांसाठी कल्याण लाभांचा सुटसुटीतपणा
- अधिसूचित जिल्हे/ विभागांव्यतिरिक्त देशभरातील सर्व जिल्ह्यातील दहा किंवा त्यापेक्षा अधिक कर्मचारी असलेल्या सर्व आस्थापनांना कर्मचारी राज्य विमा योजनेचा लाभ मिळेल.
- दहापेक्षा कमी कर्मचारी असणाऱ्या आस्थापनांना ऐच्छिक तत्वावर कर्मचारी राज्य विमा योजनेचा लाभ मिळेल.
- दहापेक्षा कमी कर्मचारी असणाऱ्या धोकादायक आस्थापनांना केंद्र सरकारच्या अधिसूचनेखाली कर्मचारी राज्य विमा योजना बंधनकारक आहे.



# कामगार संहिता- कामगारांना लाभ

- तात्पुरत्या स्वरुपाची कामे करणारे आणि विविध ठिकाणचे (प्लॅटफॉर्म) कामगार यांच्यासाठी सामाजिक सुरक्षा योजना
- कपात केलेल्या कामगारांच्या पुन:कौशल्यसाठी निधीची सुरुवात
- महिलांसाठी सर्व क्षेत्रे खुले आणि रात्रपाळीत पूर्ण सुरक्षेच्या उपायांसहित काम करण्याची परवानगी
- असंघटीत क्षेत्रातील कामगारांसाठी सामाजिक सुरक्षा निधी
- निश्चित कालावधीच्या कामगारांसाठी ग्रॅच्युईटी- 5 वर्षांऐवजी एका वर्षात ग्रॅच्युईटीसाठी पात्र



# Measures announced Yesterday

Government emblem: सत्यमेव जयते
Goverment Of India

- **काल जाहीर केलेल्या उपाययोजना**
- उद्योग आणि विशेषतः एमएसएमई साठी काल अनेक उपाययोजना जाहीर करण्यात आल्या. तुमच्या माहितीसाठी या सर्व उपाययोजना पुन्हा देत आहोत.
- एमएसएमई सह उद्योगांसाठी ३ लाख कोटी रूपयांची आपत्कालीन कृतिशील भांडवल सुविधा
- २०० कोटी रुपयांपर्यंतच्या सरकारी निविदांसाठी जागतिक निविदा नाही
- जून, जुलै आणि ऑगस्ट २०२० या महिन्यांच्या वेतनासाठी उद्योग आणि संघटित कामगारांसाठी आणखी ३ महिने ईपीएफ सहाय्य -एमएसएमई आणि अन्य उद्योगांमधील कामगारांना तरलता प्रदान करेल.
- ईपीसी आणि सवलतीच्या करारांसह कंत्राटी बंधने पूर्ण करण्यासाठी सहा महिन्यांची मुदतवाढ दिल्यामुळे  कंत्राटदारांना दिलासा
- धर्मादाय न्यास आणि बिगर-कार्पोरेट उद्योगांनाआणि व्यवसायांना  प्रलंबित प्राप्तिकर परतावे त्वरित जारी करण्याच्या निर्णयामुळे उद्योगांना कर दिलासा
- २०२०-२१ या आर्थिक वर्षाच्या उर्वरित कालावधीसाठी टीडीएस आणि टीसीएस मध्ये २५ % कपात आणि विविध कर विषयक अनुपालनासाठी मुदतवाढीमुळे सर्व उद्योगांना लाभ होणार

सत्यमेव जयते
Goverment Of India



# गरीब, स्थलांतरीत आणि शेतकरी

# स्थलांतरितांसाठी दोन महिने मोफत अन्नधान्य पुरवठा

- विविध राज्यातील स्थलांतरितांना अन्नधान्याच्या मदतीची गरजआहे.
- जे स्थलांतरित राष्ट्रीय अन्न सुरक्षा कायद्याचे किंवा राज्य कार्ड धारक लाभार्थी नाहीत त्यांना ते ज्या राज्यात अडकले आहेत तिथे कुटुंबातील प्रत्येकाला दोन महिने 5 किलो धान्य आणि 1 किलो चणाडाळ मिळेल.
- याचा लाभ आठ कोटी स्थलांतरितांना होण्याची अपेक्षा आहे.
- यासाठी दोन महिने 3,500 कोटी रुपये खर्च केले जातील.
- याचा सर्व खर्च भारत सरकारद्वारे केला जाईल.
- या योजनेच्या अंमलबजावणीसाठी, स्थलांतरितांची ओळख पटविण्यासाठी, त्यांना अन्नधान्याचे वितरण करण्यासाठी
- आणि त्यांना मार्गदर्शक सूचना देण्यासाठी राज्य सरकार जबाबदार असतील.



# एक देश एक रेशन कार्ड - स्थलांतरितांना देशातील कोणत्याही रास्त दर धान्य दुकानातून सार्वजनिक वितरण सेवा (रेशन) मिळावी यासाठी तंत्रज्ञान आधारित प्रणाली मार्च 2021 पर्यंत कार्यरत होणार

- स्थलांतरित कुटुंबे इतर राज्यात धान्य मिळवू शकत नाहीत.
- ही योजना स्थलांतरित लाभार्थ्यांना सार्वजनिक वितरण सेवा मिळवून देईल (20 राज्यात आधीच आंतरराज्य पोर्टेबिलिटी रेशन सेवा सुरू).
- पंतप्रधानांच्या तंत्रज्ञान प्रेरीत प्रणाली क्रांतीचा भाग.
- सार्वजनिक वितरण सेवेतील 83% लोकसंख्या ही 23 राज्यातील 67 कोटी लाभार्थी आहेत, यांना ऑगस्ट 2020 पर्यंत संपूर्ण देशात ही पोर्टेबिलिटी सेवा मिळू शकेल
- मार्च 2020 पर्यंत सर्वांनाच संपूर्ण देशात 100% पोर्टेबिलिटी सेवा मिळेल.
- म्हणजेच सर्व राज्य/केंद्र शासित प्रदेशांमध्ये मार्च 2021 पर्यंत ' फूड पोर्टेबिलिटी सिस्टीम ' लागू होईल.



# स्थलांतरीत मजूर/ शहरी गरीब यांच्यासाठी परवडण्याजोगी भाड्याची घरे

स्थलांतरीत मजूर/शहरातील गरीब यांना परवडणाऱ्या दरात भाड्याने घर मिळणे अवघड जाते

सरकार पंतप्रधान आवास योजने अंतर्गत स्थलांतरीत मजूर/ शहरी गरीब यांच्यासाठी परवडणाऱ्या घरांची योजना लवकरच सुरु करणार आहे.

i) शहरातील शासकीय निधीची मदत असलेली गृह योजना

खासगी - सार्वजनिक

भागीदारी असलेल्या परवडण्याजोग्या गृह संकुल (ARHC) योजनेत बदलणार

ii) उत्पादन घटक, उद्योग, संस्था यांना आपल्या जमीनीवर घरे बांधून ते भाड्याने देण्यासाठी प्रोत्साहन

iii) राज्य सरकारच्या संस्थांना/ केंद्र सरकारच्या संस्थांना अशाचप्रकारे गृह संकूल बांधण्यासाठी प्रोत्साहन

मंत्रालय लवकरच सविस्तर नियमावली प्रसिद्ध करणार आहे.



# Rs. 1500 crores Interest Subvention for MUDRA- Shishu  Loans

- मुद्रा अंतर्गत छोट्या उद्योगांना सर्वाधिक झळ बसली आहे आणि त्यांची ईएमआय भरण्याची क्षमता देखील प्रभावित झाली आहे.
- आरबीआयने यापूर्वीच कर्जावरील व्याजाला स्थगिती दिली आहे
- मुद्रा-शिशु कर्जाचा सध्याचा पोर्टफोलिओ १.६२ लाख कोटी रुपये आहे (कमाल कर्ज रक्कम रु. ५०,०००)
- त्वरित परतफेड करणाऱ्यांना केंद्र सरकार १२ महिन्यांसाठी २ % व्याज सवलत देणार
- मुद्रा-शिशु ऋणकोंना १५०० कोटी रुपयांचा दिलासा



# फेरीवाल्यांसाठी 5,000 कोटी रुपयांची विशेष पत सुविधा

- कोविड - 19 मुळे उपजिविकेवर गंभीर परिणाम झाला आहे.
- सहजगत्या आर्थिक मदत मिळावी म्हणून सरकार एक महिन्यात फेरीवाल्यांसाठी विशेष योजना राबविणार आहे.
- सुरवातीला खेळते भांडवल 10,000 कोटी रुपये असेल.
- जे लोक डिजिटल देयक सुविधा वापरतील त्यांना आर्थिक पुरस्कार दिला जाईल आणि त्यांच्या कर्जाच्या परतफेडीच्या आलेखावरून त्यांच्या खेळत्या भांडवलात वाढ करून देण्यात येईल
- जवळपास 50 लाख  फेरीवाल्यांना सहकार्य करण्यात येईल.
- 5,000 कोटी रुपयांची तरलता निर्माण होईल.



# मध्यम उत्पन्न गटाला सी एल एस एस मध्ये मुदतवाढ व गृहबांधणी क्षेत्राला रुपये 70,000 कोटींचे उत्तेजन

- 6 ते 18 लाख वार्षिक उत्पन्न असणाऱ्या मध्यम उत्पन्न गटासाठी मे 2017 पासून पत आधारित अनुदान योजना - सीएलएसएस कार्यान्वित.
- सीएलएसएस ची मुदत 31 मार्च 2020 पर्यंत वाढविली गेली.
- आतापर्यंत या योजनेचा फायदा 3.3 लाख मध्यम वर्गीय कुटुंबांना झाला आहे.
- सरकार  सीएलएसएसची मुदत मार्च 2021 पर्यंत वाढविणार आहे.
- 2020-2021दरम्यान 2.5 लाख मध्यम वर्गीय कुटुंबांना याचा लाभ मिळेल
- गृहबांधणी क्षेत्रात सुमारे रुपये 70,000 कोटीची गुंतवणूक होईल.
- रोजगार निर्मिती होईल.
- लोखंड, सिमेंट, वाहतूक व इतर बांधकाम साहित्याची मागणी वाढेल.



# कॅम्पा वनीकरण निधीच्या माध्यमातून 6000 कोटी रोजगारनिर्मिती

- नागरिकांसाठी रोजगारनिर्मितीची आवश्यकता आहे
- CAMPA कायदा 2016 अंतर्गत वनीकरण निधी व्यवस्थापन आणि योजना प्राधीकरण (CAMPA) ची स्थापना
- लवकरच 6000 कोटी रुपयांच्या योजनांना मंजूरी
- राज्यांकडून निधीचा विनियोग या कारणांसाठी
- नागरी भागासह सर्व ठिकाणी वनीकरण
- कृत्रिम पुनरुत्पादन, नैसर्गिक पुनरुत्पादनासह
- वन व्यवस्थापन, मृदा आणि आर्द्रता संवर्धनाची कामे
- वन संरक्षण, जंगल आणि वन्यजीव संबंधी पायाभूत सुविधा, वन्यजीव संवर्धन आणि व्यवस्थापन इ.
- यामुळे शहरी, निम शहरी आणि ग्रामीण भागात रोजगारनिर्मिती
- आदिवासींना रोजगारनिर्मितीची संधी



# नाबार्डच्या माध्यमातून शेतकऱ्यांना ३० हजर कोटी रुपये अतिरिक्त आपत्कालीन कृतिशील भांडवल पुरवठा

- छोटे आणि अल्पभूधारक शेतकरी यांच्याकडे अपुरी वित्तीय संसाधने
- आर आर बी आणि ग्रामीण सहकारी बँका कर्जासाठी प्रमुख स्रोत
- ग्रामीण सहकारी बँका आणि  आरआरबीच्या पीककर्ज गरजा भागवण्यासाठी नाबार्ड ३० हजार कोटी रुपयांचे अतिरिक्त पुनर्वित्तीय सहाय्य पुरवणार
- या वर्षात नाबार्डकडून  नेहमीच्या पुनर्वित्तीय मार्गाने दिल्या जाणाऱ्या ९० हजार कोटी रुपयांच्या व्यतिरिक्त हे सहाय्य असेल.
- ३३ राज्य सहकारी बँका, ३५१ जिल्हा सहकारी बँका आणि ४३ आरआरबीना फ्रंट लोडेड ऑन -टॅप सुविधा त्यांच्या कर्जानुसार उपलब्ध
- सुमारे ३ कोटी शेतकऱ्यांना लाभ होणार -बहुतांश छोटे आणि अल्पभूधारक शेतकरी
- मे/जून मधील पीक कापणी नंतर (रब्बी ) आणि चालू खरीप हंगामाची गरज पूर्ण करण्यासाठी



# किसान क्रेडिट कार्डच्या माध्यमातून 2.5 कोटी शेतकऱ्यांना 2 लाख कोटी रुपयांचा सवलतीच्या दरात पतपुरवठा

- प्रधानमंत्री किसान लाभार्थ्यांना किसान क्रेडिट कार्डच्या माध्यमातून सवलतीच्या दरात पतपुरवठा करण्यासाठी विशेष अभियान राबविले जाणार
- या अभियानात मच्छिमार आणि पशुपालक शेतकऱ्यांचाही समावेश
- याद्वारे अशा शेतकऱ्यांना सवलतीच्या व्याज दराने संस्थात्मक पतपुरवठा उपलब्ध होऊ शकेल.
- 2 लाख कोटी रुपये पतपुरवठ्यातून 2.5 कोटी शेतकऱ्यांना लाभ मिळेल.



सत्यमेव जयते
Goverment Of India

# धन्यवाद